१७७१४

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा. क्र. १७७१४

# शापित [redacted] राजपुत्र

IRBK-0117714
IRBK-0117714

IRBK-0117714

IRBK-0117714

# १: शापित राजपुत्र

त्या झोपडीत राजकन्या एकटीच बसली होती. झोपडीत? आणि राजकन्या? हे ऐकायला विचित्र वाटले तरी दुर्दैवाने अगदी खरे होते. ती नुसतीच झोपडीत राहात नव्हती तर तिथे ती कैदेत होती व झोपडीच्या दाराशी सदोदित एक धिप्पाड उग्र बाई पहारा करी, ती पहारेकरीण हिला पाय मोकळे करायला सुद्धा हिंडू-फिरू द्यायची नाही अंगणात.

राजकन्या भारीच सुरेख, व मोठी गोड मुलगी. कोणतीही परिस्थिती येवो, रडत बसायचे नाही, असे तिच्या वडिलांनी तिला शिकवलेले होते. तिने आज स्वत:पुरता स्वयंपाक केला व खिडकीतून ती दूर रानात त्या ठेंगू व मुक्या माणसाची वाट पहात राहिली. तो आठवड्यातून एकदा पाठीवर शिध्याचे पोते घेऊन यायचा. त्यात गव्हाचे पीठ, तांदूळ, भाज्या, मीठ, मिरे, थोडी साखर, तेल असलं आठ दिवस पुरेल इतकं स्वयंपाकाचं सामान असे.

त्याची वाट पाहतापाहता तिच्या मनात खूप विचार आले.

तिचा बाप आयर्लंडचा शूर राजा. किती वैभवात होती ती त्या वेळी ! राजाची एकुलती एक लाडकी मुलगी, फिरून आईवेगळी. तिचे लालनपालन किती लाडाने व्हायचे ! कोणतीही गोष्ट तिनं हवी म्हटलं, की घटकाभरातच तिच्या पायाशी त्या वस्तूचा ढीग येऊन पडे ! बारा दासी होत्या तिच्यासाठी नेमलेल्या. दागदागिने कपडे यांचा तर थाटमाट असायचा !

अन् एका रात्रीत हे सारे संपले ! तिचा काका, राजाचा धाकटा भाऊ त्याला राज्य हवं होतं, त्यानं राजाला रातोरात कपटाने ठार केलं व राजकन्येला घोर अरण्यात आणून या झोपडीत कैदेत ठेवलं. राजधानीपासून किती दूर होतं हे जंगल, कोण जाणे ! तिचा चुलता मग म्हणाला–

'पोरी, तुला आयर्लंडचं राज्य नाही मिळायचं, इथं जंगलात खुशाल वाघासिंहांचं राज्य कर हवं तर ! मी चांगला आहे म्हणून तुला जिवंत तरी ठेवतो आहे– पण जर का इथून पळून जायचा यत्न केलास तर मात्र– ठारच करीन; ध्यानात ठेव.'

राजकन्या काय बोलणार बापडी ? वडील ठार झालेले, सगळं वैभव राहिलं राजवाड्यात व गरीब झोपडीत चटईवर झोपणं आणि भाजीभाकरी खाऊन जगणं वाटणीस आलेलं ! तिनं डोळे पुसले व 'ठीक आहे काका. मी इथे मुकाट्यानं राहीन !' म्हटले व तिचा तो निर्दय काका फिदीफिदी हसत चालता झाला.

ते सगळं तिला रोज आठवायचं. आत्ताही आठवलं. ती मनात म्हणाली– 'इथे बोलायला सुद्धा कुणी नाही मला. पोपट, मैन तरी पाळीन म्हणते. त्याच्याशी मला बोलता येईल. पण मल कोण आणून देणार पोपट तरी ?'

ठेंगू नोकर आलाच तेवढ्यात शिध्याचं पोतं घेऊन. खूप दमल

होता तो. उंचीला लहान मुलाएवढा व एवढं मोठं पोतं पाठीवर घेऊन यायचं दुरून, मग दमणारच ! तिनं त्याला पाणी दिलं व थोडी रोटीभाजी दिली व म्हटले,

' खा बाबा, दुरून येतोस, दमलेला दिसतोस. कशी झालीय रोटी ? मला आता करता येते– मी कधी केलीच नव्हती रे तिकडे. '

ठेंगूला बोलता येत नव्हते, पण ऐकू येत होते चांगले. त्याने खुणा करीत सांगितले–' रोटी मस्त झाली आहे, पण मला बोलता येत नाही ! फार वाईट वाटतं मला तुझ्याबद्दल राजकन्ये– '

राजकन्या हसली अन् म्हणाली,

' देव ठेवील तसे राहावे लागते बाबा. माझ्याहून तुझी स्थिती किती वाईट आहे बघ– तुला बोलताही येत नाही व कष्ट करावे लागतात इतके, म्हणून मलाच उलट वाईट वाटतं तुझ्यासाठी. '

मग ठेंगूचा कुरूप ओबडधोबड चेहराही जरा प्रसन्न झाला व तो हळूहळू चालू लागला.

त्याच्या मनांत आलं, ' राजकन्या किती धीराची व चांगल्या स्वभावाची आहे ! तीन वर्षं दर आठवड्याला मी झोपडीत जाऊन शिधा देतो आहे. तीही बोलते माझ्याशी. एक पोपटाचा पिंजरा मी देणार आहे आणून आता, पण एक आहे. या तीन वर्षांत तिनं त्या दुष्ट काकाला सुद्धा कधी शिव्याशाप दिलेले ऐकू आले नाहीत. भारीच सज्जन पोरगी. मी चांगला आणि बोलका असतो तर ? तर मी तिची सुटका केली असती, पण टिचभर माणूस, फिरून वाचा नाही मला ! काय करणार मी. '

एक दिवस ठेंगू परत जाताना त्या घनदाट जंगलातून झाडावरून खूप जोराचा आवाज आला–

‘ठेंगूबुवा ! जरा थांबा ! मी केव्हाची वाट पाहतो आहे तुमची इथे ! थांबा !’

‘आँ ? माझी वाट पाहणारंही कुणी या जगात आहे का ? मला ठाऊकच नाही !’ तो स्वत:शी मनातल्या मनातच म्हणाला व वर झाडाकडे पाहू लागला, कोण बोलले एवढे ओरडून ? पाहतो तो वरती आपल्या एवढ्या उंचीचा एक छोटा पण भारी सुंदर मनुष्य–! तो टपकन चेंडूसारखी उडी घेऊन त्याच्यासमोर टपकला. अरे त्याच्या डोक्यावर एक छानदार मोत्यांचा मुकुटही होता ! कपडे रेशमी होते. त्यावरही हिरेमोती जडवलेले, तेही लखलखत होते ! तो म्हणाला,

‘ठेंगूबुवा ! मला तुम्हाला काही विचारायचे आहे. सांगता ?’

ठेंगूने खाणाखुणा करून ‘मला बोलता येत नाही’ म्हणून सुचवले.

तो मुकुटवाला म्हणाला–

‘असं ? आत्ताच मी तुम्हाला बोलकं करतो. चला माझ्या-बरोबर !’

त्याने ठेंगूला एका पर्वतापाशी नेले व काही खूण करताच पर्वतातले एक गुप्त दार खटकन उघडले. ठेंगू बघतो, तो आत वैभवशाली एक महाल ! नोकर-चाकर, दासी सगळे इतकेसे इतकेसे, ठेंगूच, पण खूप सुंदर माणसं अन् बोलकी सगळी. जणू ते बोलक्या ठेंगूचे राज्य होते. त्यापुढे आपला कळकट रंग, बटबटीत डोळे, जाडेभरडे ओठ, याची मुक्या ठेंगूला शरम वाटू लागली अगदी. बरोबर असलेला मुकुटवाला म्हणाला, ‘ठेंगू, मी १ऱ्यांचा राजा आहे अन् हा माझा राजमहाल आहे ! कसा आहे ? आवडला तुला ?’

ठेंगूला वाटले– 'छान छान आहे ! म्हणून ओरडावे ! पण बोलणार कसा ? नुसताच डोळे चढवून 'सुंदर !' अशा खुणा करू लागला.

परीराजा हसला अन् म्हणाला–

'अरे, पहिली गोष्ट तुला बोलकं करायची ! दासी, आपला 'स्वरदंड' आण बरं ? ' एका दासीपरीने धावत जाऊन स्वरदंड आणला. तो हस्तिदंताचा व सोन्याच्या नक्षीचा होता. तो हातांत घेऊन तीन वेळा राजाने त्याच्या मस्तकावर टेकला व म्हटले, 'बोल आता ! तुला बोलता येते चांगले. मी तुला आवाज दिला आहे. सांग, तू कोण ? इकडे कुठे येतोस दर शनिवारी ? पोतं कसलं आणतोस ? कुणाला देतोस ? '

ठेंगू सवईने खाणाखुणा करू लागला व हसला एकदम. त्याला आठवले. बोलायला येत आहे, बोलूनच सांगू ! खुणा नकोत !

तो ओरडून म्हणाला–

'मी कोण ? कोणजाणे – मला आठवतं तेव्हापासून मी एकटाच आहे व मुकाच आहे. या राजाकडे नोकर आहे सातव्या वर्षापासून.'

'अरे, हळू सांगितलेस तरी चालेल की. आवाज एकदम मिळाल्यामुळे जरा तुला त्यावर ताबा ठेवतां येत नाही. बरं तुझे तुला ठाऊक नाही, तू कोण ते ? अच्छा, मी सांगतो. पण तुला तुझं बाळपण काहीच नाही का आठवत ? '

'कधी कधी– फार थोडं आठवतं. वाटतं अशाच एका महालात मी राहिलो आहे कधी तरी– खूप माणसं असलेल्या. बस् ! '

'हं, बरोबर. ते सारं खरंच आहे. बरं इकडे कुठे जात असतोस ? '

ठेंगूने राजकन्येची हकीकत सांगितली व म्हटले-

' मी ताकदवान असतो तर तिची सुटका केली असती महाराज.'

' तुझ्यात धैर्य आणि साहस असेल तर मी उपाय सांगेन तिच्या सुटकेचा- '

' सांगा सांगा महाराज, तिच्यासाठी मरणाशीही लढायला तयार होईन- फक्त मी मोठ्या आकाराचा हवा होतो- '

' तर मग मी तुला एक हकीकत सांगतो ती ऐक हं जरा-

' एक अति दृष्ट चेटकीण या पलीकडच्या जंगलात गुहेत राहते. ती या राजकन्येच्या काकाची मैत्रीणच आहे. तूही एक राजपुत्र आहेस, पण या काकाने तुला पळवून आणलं लहानपणी व त्या चेटकीणीनं तुला ठेंगू व मुका बनवून तुझी स्मरणशक्तीही जादूने नाहीशी केली- म्हणून तुला काहीएक आठवत नाही ! '

' पण का ? त्या काकांच मी काय घोडं मारलं होतं माझी असली अवस्था करून टाकायला ? ' ठेंगू म्हणाला.

' अरे, तूही एका राज्याचा मालक, लहान मुलगा. तुलाच पळवून नेऊन त्यानं तेही राज्य आपण जिंकून घेतलेलं आहे- '

' अन् मला नोकर करून डांबून ठेवलं आहे ! दुष्ट, नीच कुठला. राजेसरकार, ह्या दुष्ट नीच माणसाला शिक्षा करायचा काही उपायच नाही का ? त्या चेटकीणीने घातलेली विस्मरणाची जादूही उतरायचा मला उपाय सांगाल का ?-फार उपकार होतील - '

' आहे, एकच उपाय आहे. परीताल म्हणून एक सुंदर सरोवर आहे. तेथे सूर्यासारखी चमकणारी चांदीची ढाल आहे व सोन्याचा विजेसारखा चमकणारा भाला आहे. तू साहस करून या दोन

गोष्टी आणशील तर सारं ठीक होईल व मग तुला राजकन्येची सुटकाही करता येईल ! जातोस ?'

'जाणार, मी जाणारच ! माझे वाटेल ते होऊ दे, मी प्रयत्न करीन.'

'छान ! तिकडे जाण्यात संकटं जरूर येतील पण धीराने तोंड दे. उद्या मी तुला वाट सांगेन व घोडाही देईन. आज आता स्वस्थ झोपा राजकुमार !'

तेथले उत्तम जेवण–कितीक दिवसांत असे रुचिकर अन्न त्याने पाहिले नव्हते ! जेवण व छानसे मऊ अंथरुण तो सगळे विसरला. झोपी गेला गाढ गाढ !

परीराजा त्याच्याकडे पाहत म्हणाला – 'उद्या तू खरा राजकुमार होशील व किती छान दिसशील बेटा !'

•

सकाळी ठेंगूच्या योग्य एक छोटा चपळ घोडा देऊन परीराजा म्हणाला.

'तू येथून थेट पूर्व दिशेकडे चालत रहा की समुद्रावर पोहोचशील. या समुद्रालाच परिताल म्हणतात. यात मधोमध एक लहानसे बेट आहे, तेथे तो भाला व तलवार ठेवलेली आहे. त्यांच्या रक्षणार्थ राक्षस ठेवलेले आहेत ते तुला त्रास देतील– आणि कर मागतील समुद्रातून पोहत जायचा !'

'काय ? मी समुद्रातून पोहून जाऊ ? मी लहान मुलासारखा –'

जरूर पडली तर मी आहेच मदतीला. चला तरी, मग बघू– अन् तुमचा घोडा उत्तम पोहणारा आहे ठेंगूदादा चला !'

परीराजाने सांगितल्याप्रमाणेच बराच वेळ घोडदौड करून ठेंगू

समुद्रकाठी आला व त्याने बेधडक समुद्रात घोडा घातला ! तशी समुद्रात धुराचे लोट उठू लागले. ते सर्व आकराळ विकराळ राक्षस पहारेकरी होते. तलवार व भाल्याचे. ते सारे त्याच्या चोहो-बाजूस घेरावा घालून उभे राहिले व ओरडले–

'नखाएवढा माणूस अन् त्याचे धैर्य तर बघा इथं येण्याचं !'

'याची दामटी वळून टाकू – एका क्षणांतच – घोड्यासकट !'

'नको रे, तो घोडा किती सुंदर आहे बघा एकदा !'

एका राक्षसाने विचारले–

'ए बुटक्या, इथे का आलाहेस रे ?'

'परीतालातली तलवार व भाला न्यायला.' तो ठेंगू म्हणाला. ते सगळे कुचेष्टेने हसले. मग त्यातला एक राक्षस ओरडला,

'ए क्षुद्र प्राण्या, हा घोडा आमचा समुद्रकर म्हणून दे, म्हणजे तुला आम्ही जिवंत सोडतो ! म्हणे तलवार हवी आहे– भाला हवा आहे !'

दुसरा म्हणाला– 'बाबा, ते काही खेळणं नाही पोरांचं, परत जा कसा तू ?'

'नाही जात ! ती तलवार, भाला न्यायलाच आलोय.' त्याने ओरडून सांगितले तशी ते परत सगळे हसू लागले व ओरडू लागले.

'उंची वीतभर बाता हातभर ! लहान तोंडी मोठा घास घ्यायला आलंय कार्टं ! घ्या रे सगळेजण दंडे तुमचे अन् ह्या पोराला हाकला ! करा गर्जना– 'समुद्रराजाचा विजय असो–'

ते इतक्या जोराने ओरडले की त्याला वाटले आपले कान फुटणारच ! मग ते दंडे, गदा सावरून पुढे येऊ लागले. ठेंगू तसाच पुढे चालू लागला– तेवढ्यात एक सुंदर बासरी वाजू



राक्षस पहारेकरी दंडे घेऊन बुटक्याला अडवायला आले !

लागली. इतकी सुरेल की काय सांगावे ? ते सारे राक्षस पेंगू लागले ती ऐकून एकदम व समुद्रातच आडवे झाले व झोपी गेले ! सगळा दंगा बंद !

हा काय चमत्कार ? त्याने वळून पाहिले.

पऱ्यांचा राजा किनाऱ्यावर बासरी वाजवीत उभा ! तो हसत म्हणाला– 'जा आता थेट बेटावर. हे राक्षस झोपलेत तोवर समुद्रात कुणी बुडतच नाही. लवकर जाऊन ये– पळ.'

मग ठेंगू खुषीने घोड्याला दामटीत पुढे निघाला व बेटावर

आला. बेटावर कुणीही माणूस नव्हतें. एक मोठा डोंगर होता, त्याच्या पायथ्याशी गवत उगवले होते व त्यांतच जणू भाला उगवला होता ईश्वरी कृपेने ! चांदीची ढाल तेथेच शेजारी होती. ती तर इतकी चकाकत होती की जणू आरसाच एखादा.

बेटावर जाताच ढालीकडे तो वळला व ढालीतून एक देखणा तरुण हसतो आहे असे त्याला दिसले. उंच सुंदर, निळ्या डोळ्यांचा, गोरापान वीस वर्षांचा तरुण ! त्याच्या केसांवर एक मुकुटही होता !

हा कोण आपल्या आधीच आला बेटावर ? त्याने ओठ आवळले तर त्या ढालीतल्या तरुणानेही ओठ आवळले. याने कपाळाला पाच-सहा आठया घातल्या त्यानेही घातल्या– अरेच्या ! आता त्याच्या नीट ध्यानात आले– ते त्याचेच प्रतिबिंब होते ! बेटाला पाय लागताच त्या चेटकिणीची जादू पार खलास होऊन त्याला पूर्वरूप प्राप्त झाले होते व आता त्याची स्मरण-शक्तीही परत आली होती एकदम सारी ! केवढी देवाची किंवा त्या परीराजाची कृपा ? त्याने आनंदाने ढालतलवार घेतली व तो किनारी आला. आता तो केवढा उंच, बळकट व देखणा राजपुत्र झाला होता ! त्याने पहिले काम केले ते राजकन्येची सुटका करण्याचे. तो घोर अरण्यात गेला– पण हे काय ? ती गलिच्छ बंद झोपडी कुठेच नाही ! उलट तेथे सुंदर फुलांची एक बाग होती व त्या बागेत एक अतिशय झकास घर होते. त्या दारात राजकुमारी उभी होती !

आता राजपुत्राच्या लक्षात आले–

ती झोपडी चेटकिणीची होती व त्याच्या हातात जादूची ढाल तलवार येताच चेटकिणीची रानावरचीही जादू संपली होती व

हे सुंदर उद्यान व त्यातले आयर्लंडच्या राजाचे हे आरामगृह पुन्हा पहिल्यासारखे झाले होते.

ठेंगूने– पण आता त्याला ठेंगू म्हणणे बरे नाही– तो कितीतरी उंच झाला होता– आणि मुकाही नव्हता तो ! त्या राजपुत्राने राजकुमारीला सारे सांगितले. कानावर तिचा विश्वास बसेना ! पण मग ती आनंदाने हसली. त्याचे सारे अधिकारी आपला पळवून नेलेला राजा परत सुखरूप राजवाड्यात आला हे पाहून अगदी आनंदीत झाले. त्याने मग मोठे सैन्य घेऊन राजकुमारीच्या त्या दुष्ट काकावर हल्ला केला. त्या युद्धात अर्थातच राजकुमाराचा विजय झाला व आपल्या सख्ख्या भावाला मारून राजा झालेला दुष्ट माणूस या लढाईत मारला गेला व ती चेटकीण ? ती दूर कुठे नाहीशी झाली– तिचा अजून पत्ता नाही !

आता ती दोन्ही राज्ये एक झाली, आयर्लंडची राणी राजकुमारी व राजकुमार सुखाने राज्य करीत आहेत व तो परीराजा त्यांचा जिवाचा मित्र झाला आहे !

★

## २ : राजपुत्र निनाव

त्या राजाचं मोठं राज्य होतं, सगळं वैभव होतं. राजा व राणी सुदृढ व स्वभावानेही उत्तम होते– पण तिथे एक नव्हतं– त्यांना मूल होत नव्हते ! बागेत फूल फुलत नाही, तर ती बाग कशी भयाण दिसेल ? तसे त्यांचे अर्धे आयुष्य त्यांना ओसाड वाटायचं, पण मग देवाची कृपा झाली व राणीला बाळ होण्याचे लक्षण दिसू लागले. तेवढ्यात राजाला एकाएकी दूरदेशी कुठंतरी जावं लागलं. राजा गावी गेला, व नंतर राणीला एक छानसा मुलगा झाला. राणी मनात म्हणाली--

'महाराज आल्यावर त्याचं नाव नीट समारंभ करून ठेवू त्यांना आवडेल ते. तोवर याला आपलं 'नि-नाव' म्हणत जाऊ.'

राजाला याची काहीच कल्पना नव्हती. त्याला यायला फारच दिवस लागले. चांगली ७-८ वर्षं ! तोवर निनाव चांगला झकास सात वर्षांचा झाला होता. सात वर्षांनी राजा परतला. पण वाटेत एक मोठी नदी होती, महापूर लोटला होता तिला. त्यातून नावेने येता येता भोवऱ्यात नाव सापडली व गरगरत राहून अखेर

बुडाली ! राजाच्या बरोबरचे लोक सारे बुडून मेले. राजाही बुडणारच होता, तेवढ्यात एक राक्षस त्याला दिसला. तो म्हणाला,

'राजा, मी तुला उचलून पलीकडे तीरावर नेऊन ठेवीन, पण याबद्दल तू मला काय देणार ? ते सांग.'

राजा कसेबसे म्हणाला– 'तू मागशील ते देईन, पण माझा जीव वाचव बाबा–'

'मग मला निनाव दे ! दिलं म्हण, तर मी नेतो, नाहीतर मर !'

निनाव ? हे कोण ? की ही एखादी वस्तु ? राजाला काहीच समजेना. तो म्हणाला– 'बरं बाबा ! 'निनाव' माझ्या घरात असेल तर ते तुला मी दिलं ! वचन ! आता काढ पाण्याबाहेर मला.'

राक्षसाला त्यात काय कठीण ? एखादी बाहुली उचलावी तसे त्या प्रचंड राक्षसाने त्याला उचलून घेतले व पैलतीरावर ठेवून दिले, मग तो कुठे नाहीसा झाला.

आणि सगळा आनंद नाहीसा झाला राजाचा– मुलाचे– आपल्या मुलाचेच नाव 'निनाव' हे ऐकून ! किती देखणा झकास मुलगा, एकुलता एक, किती वर्षांनी झालेला. अन् तो भयंकर राक्षसाला देऊन टाकायचा ? अरेरे ! तो राणीला रागाने म्हणाला–

'अग, तो एवढा राजपुत्र अन् त्याचं नाव असलं का ठेवलंस तू ?'

राणी म्हणाली, 'आपल्याला सात वर्षं येता येणार नाही हे

मला कुठं माहीत होतं ? लाडक्या मुलाचं नाव तुम्ही ठेवावं असं वाटलं होतं मला.'

राजा म्हणाला– 'जाऊ दे, जे काय होणार असेल ते चुकत नाही. आता काय उपाय करावा ते सांग.'

'त्या राक्षसानं बाळाला पाहिलं नाही आहे, आपल्या माळ्याचा मुलगा अन् परटाचा मुलगा अगदी माझ्या निनावएवढेच आहेत. त्यातल्या एकाला देऊ पाठवून. पैसे देऊ खूपसे त्या मुलाच्या बापाला. राक्षसाला कसं कळणार हा राजपुत्र नाही म्हणून ?'

'हं, हा उपाय बरा वाटला त्या दोघांना अन् चार दिवसांनी राक्षस मुलाला मागायला दारात उभाच ! मग माळ्याच्या मुलाला राजपुत्राचे कपडे घालून राजाने राक्षसाला देऊन टाकले. त्याला पाठीवर घेऊन राक्षस नाहीसा झाला. वाटेत त्यानं विचारलं–

'ए पोरा, दुपार, जेवायची वेळ झाली, काय करतो तुझा बाप यावेळी ?'

मुलगा म्हणाला– 'बाबा यावेळी झाडांना पाणी देतात रोज.'

'म्हणजे तू माळ्याचा ?'

'होय महाराज–'

हे ऐकताच राक्षसाने संतापाने मुलाला दूर फेकून दिले, तो मेला !

परत राक्षसाने दुसरा मुलगा 'राजपुत्र निनाव' समजून आणला, त्यालाही तोच प्रश्न– 'दुपारच्या वेळी तुझा बाप काय करतो ?'

'कपडे धुतात बाबा राजाराणीचे यावेळी रोज.'

हे उत्तर ऐकून त्या मुलाचीही तीच वासलात लागली !

तिसऱ्यांदा राक्षस दारात उभा राहून गर्जून म्हणाला,

‘ राजा, याद राख. आता जर खरा निनाव मला दिला नाहीस, तर तुम्हाला सगळ्यांना मी ठार करीन ! अरे, आपलं वचन पाळायला नको का तुला ?’

मग मात्र राजाने नाइलाजाने निनावला त्याच्या हवाली केलं.

तरी निनावला वाटेत त्याने विचारलंच– ‘ यावेळी तुझा बाप काय करतो ?’

‘ तो यावेळी दरबारात बसून प्रजेच्या सुखसोयींची विचारपूस करतो व न्याय देतो !’ राजपुत्र म्हणाला व राक्षसाची खात्री पटली की हाच खरा राजपुत्र.

राक्षसाने त्याला आपल्या घरी नेलें व चांगले जतन केले त्याचे.

*

काही वर्षे उलटली, तो आता झकास तरुण झाला व शक्तीमानही झाला चांगला. निनावचे दिवस तिथे मजेत चालले होते. राक्षसाला एक सुदृढ व सुंदर कन्या होती, ती तर राजपुत्राची जिवलग मैत्रीण झाली होती.

एक दिवस राक्षस म्हणाला,

‘ निनाव, तू खूप दिवस बसून खाल्लंस माझ्या घरी नुसते. आता उद्यापासून मी तुला काम देणार आहे !’

‘ द्या. मी कधी नाही म्हटलं ? सांगा काम ! ’

‘ माझा एक तबेला आहे – सात मैल रुंद, सात मैल लांब, इतका मोठा. पण हा सात वर्षांत कुणी साफ केलेला नाही रिकामा पडला आहे. तो उद्याच्या दिवसात साफ करून दे बारा तासात नाहीतर खाऊन टाकीन तुला मी निनाव्या ! ’

बिचारा निनाव, राक्षस निघून गेल्यावर डोके धरून बसून राहिला. एवढा मोठा तबेला एका दिवसात साफ होणार तरी कसा ? आपण उद्या मरणार हेच खरं.

त्याला उदास पाहून राक्षसाची मुलगी म्हणाली –

'अहो, ही कामे मोठी दिसली, तरी चटकन् करण्याच्या युक्त्या मला ठाऊक आहेत ना, मी राक्षसाची मुलगीच तर आहे. मला येतं सारं, अन् मी करीन मदत तुम्हाला.'

मग ती त्याच्याबरोबर तबेल्यांत गेली व तिने काही मंत्र म्हटले तशी रानातले कित्येक पशु व आकाशातून जाणारे शेकडो पक्षी तेथे आले ! त्यांना तिने कोठल्यातरी भाषेत तबला साफ करायचा हुकूम केला अन् काय चमत्कार ! त्या सगळ्यांनी दुपारपर्यंत सगळे ते सात मैल लांब-रुंद रान लख्ख चक्क करून टाकले ! मग ते सारे पशुपक्षी निघून गेले व राक्षसाची मुलगीही घरी आली. दुसरे दिवशी राक्षसाने तबेला पाहिला तर तो आरशासारखा स्वच्छ !

राक्षस रागाने ओरडला,

'कारट्या, तुला कुणी मदत करणारा भेटला वाटतं इथे ? बरं, आता उद्या पाहू. उद्या दुसरं कठीण काम आहे. माझा एक तलाव आहे. सात मैल लांब ,सात मैल रुंद व सात मैल खोल ! तो एका दिवसात मला कोरडा करून दे बघ, नाहीतर तुझी चटणीच केली म्हणून समज !'

'बापरे, हे प्रचंड काम एक दिवसात कसे करू मी ?' तो स्वतःशी पुटपुटला. खिन्न होऊन बसला. जेवायला येईना, तशी राक्षसकन्या म्हणाली–

'इतकी चिंता नको त्याची. मी पाहून घेईन कामाचं त्या. चला, जेवण करा नीट.'

दुसरे दिवशी तीही राजपुत्राबरोबर तलावाकडे गेली. तिने मंत्राने सगळ्या तलावातल्या लहानमोठ्या माशांना बोलावले व 'त्यातले सर्व पाणी पिऊन टाका!' म्हणून आज्ञा केली. हजारो, लाखो मोठमोठे मासे होते ते. त्यांनी पाहतापाहता सारा तलाव कोरडा करून टाकला!' राजपुत्राचे हेही काम फक्कड जमले.

तरीही राक्षस खूष झाला नाही. तो चिडून म्हणाला,

'ठीक ठीक, उद्या बघतो कसं काम पुरं करतोस ते. माझ्या बागेत एक सरळसोट उंच झाड आहे. त्याच्या फांद्या ढगावर गेल्या आहेत इतक्या उंच! पण त्याचं खोड अतिशय गुळगुळीत आहे. त्यातल्या सर्वांत उंच फांदीवर एक पक्ष्याचं घरटं आहे. त्यात सात अंडी आहेत. ती सर्व तू मला काढून आणून दे. एकही फुटता कामा नये! फुटलं तर उभा खाऊनच टाकीन तुला, याद राख!'

राक्षस धपाधप पावले टाकीत चालता झाला. आजचे काम खरेच सर्वांत कठीण होते. झाडावर चढू लागला की त्याचे पाय घसरू लागत! 'अशा स्थितीत उतरताना अंडी काढून आणू? तीही न फुटता? नाही! हे कुठलं जमणार? आता मात्र माझं आयुष्य संपलं, नक्की!' तो दुःखाने राक्षसकन्येला म्हणाला.

ती म्हणाली,'यावेळी जादूचा उपयोग होऊ नये असलं काम काढलंय बाबांनी मुद्दाम, पण चला तरी, मी मदत करते.'

तिने हाताची चार बोटे काढून ती झाडाला चिकटवीत त्याच्या पायऱ्या बनवल्या...त्यावर राजपुत्र पाऊल टेकत वर गेला, की

ती तीच बोटे जरा वरच्या बाजूला खोडाला चिकटवीत राहिली. राक्षसकन्येचीच बोटे ती, मजबूत कठीण, घट्ट व फार मोठ-मोठ्या आकाराची झालेली होती. या युक्तीने तो वरपर्यंत गेला व त्याने ती अंडी काढून आणली...पण या धांदलीत एक अंडे खाली पडून फुटलेच !

'आता ?' राजपुत्र म्हणाला.

'आता, माझा बाप क्षमा नाही करणार तुम्हाला या चुकीची. निनाव, आपले सगळे श्रम फुकट गेले. आपण दोघेही आता पळून जाऊ या अन् तुमच्या घरी जाऊ. माझा बाप तुमचा जीव घ्यायच्या प्रयत्नात आहे ते मला नाही आवडत ! मी तुमच्याशी लग्न करणार आहे चालेल ना ?'

राजपुत्राला खूप आनंद झाला. त्याची सुटका होणार होती व सुंदर बायकोही मिळणार होती. राक्षसकन्या स्वभावानेही सरळ साधी होती.

तो म्हणाला, 'चल तर लौकर !'

तिने बोटे हातावर परत बसवून जादूचे मलम लावले तशी ती अगदी दुरुस्त झाली, पहिल्यासारखी हाताला चिकटली व जखमही उरली नाही ! मग तिने आपली जादूच्या पाण्याची झारी आणली व एका वेगवान घोड्यावर बसून ते भरधाव निघाले.

*

इकडे राक्षस घरी आला, बघतो तर काय ? पाखरे पिंजऱ्या-तून सुटून उडून गेलेली ! त्या कारट्याबरोबर माझी मुलगी पण गेली ? थांबा, जाता कुठे ? आत्ता गाठतो तुम्हाला !' तो रागाने म्हणाला व जोरात निघाला मागावर मागे त्यांच्या. हे

दोघं दोन-चार मैल जातात तोवर राक्षसाची धप्प् धप्प् पावले राक्षसकन्येला ऐकू आली ती म्हणाली,



निनाव व राक्षसकन्येचा राक्षसाने पाठलाग सुरू केला.

'अहो, घाई करा! बाबा आले. माझ्या केसांतली ती लांब फणी काढून फेका मागे अन् चला पुढे लौकर.'

आणि काय नवल ? त्या फणीच्या दरेक दात्यांतून एकेक मोठे उंच काटेरी झाड उत्पन्न झाले व राक्षसाच्या वाटेवर एक काटे-रानाचे जंगल उभे राहिले– भले मोठे !

या काटेजंगलातून वाट काढायला राक्षसाला थोडाबहुत वेळ

लागलाच, तोवर यांचे घोडे बरेच दूर आले; पण राक्षसाचा वेगही कमी नव्हता काही ! त्याची पावले परत ऐकताच तिने कपड्यांतून एक छोटा खंजीर काढून तो मागे फेकला तर त्या जागी लहान कट्यारी तलवारींची अगदी दाटी झाली ! कट्यारी तलवार व खंजिरांनी भरलेले रानच्या रान व ते सगळे तीव्र धारेचे, अणकुचीदार ! या रस्त्यातल्या अडथळ्यांतून बाहेर पडायला राक्षसाला खूप वेळ लागला, पण तो बोलून चालून राक्षसच ! एका घटकेत त्यातून वाट काढून तो मुलीला शिव्या देत धावू लागला– व त्याने त्यांना गाठले.

आता हात लांब करून तो त्या दोघांना पकडणार तोच– राक्षसकन्येने पाण्याचे भांडे मागे फेकले. ते फुटले, पण तेही जादूचेच होते– पाहता पाहता त्या जागी पाण्याचा मोठा तलाव उत्पन्न झाला. तो एवढा खोल की राक्षसाच्या डोक्यावरून त्याच्या लाटा वाहत गेल्या व अखेर तो दुष्ट राक्षस त्या जादूच्या पाण्यात बुडून मरण पावला. पीडा टळली !

आणि एवढ्यात राजपुत्राची राजधानी व भला मोठा राजवाडा दिसू लागला दूर. तो म्हणाला,

'राणी, आपलं घर आलं, चल आता घरी विश्रांतीला !' पण राक्षसकन्या या दिवसभराच्या धावपळीने व त्रासाने इतकी दमली थकली होती की ती म्हणाली–

'आता मला एक पाऊलही उचलण्याची ताकद नाही ! कुठेतरी जाऊन झोपावंसं झालं आहे. रस्त्यातच झाडाखाली थांबा. मी जरा विसावा घेते, कसं ?'

राजपुत्र म्हणाला,

'बरं तर, तू जरा इथं थांब, मी जवळपास एखादी कुणाची

झोपडी असेल तर बघून येतो. तेथे जाऊ आपण. बैस, जरा झोपू नकोस हां '!

तो गेला तो वाटेत माळ्याचीच झोपडी. माळी बाहेर गेला होता, पण बायको होती. तिनं निनावला लगेच ओळखलं.

इतके दिवस ती मनातून इतकी चिडली होती की बस् ! मनात म्हणाली, ' याच मेल्या निनाव्याच्या पायात माझा मुलगा याच्या बापानं राक्षसाला दिला अन् त्याने त्याला मारून टाकलं. तो मेला अन् हा जगला, नाही का ? बघते, याचा सूड घेते.'

त्याने विचारले,

' राहायला, झोपायला जागा मिळेळ का रात्रभर ? पैसे देतो बरेच मी–'

माळीण म्हणाली– ' राजपुत्र निनाव, तुमचा राजवाडा तो काय समोर दिसतो ! वीस-पंचवीस पावलांवर तर आहे. तिकडेच आपण जा राहायला. बिचारे म्हातारे आई-बाप वाट बघताहेत कधीची तुमची–'

'हं, तेही खरंच, बरं ' पाणी द्याल तर बरं पेलाभर.'

माळीण होय म्हणाली पण पाण्यात तिनं झोपेची गुंगी येणारं औषध दिलं टाकून बरंचसं ! दुष्टपणाने ती मनाशी म्हणाली, ' नीज आता महिनाभर खुशाल !'

आणि खरेच ,राजपुत्र राजवाड्याच्या दारात पोचला तो पेंगायला लागला ! कसाबसा एका महालात गेला व तेथल्या एका कोचावर पडला तर त्याला अगदी गाढ झोप लागली ! कुणाला तो आल्याचे माहीतच नाही !

इकडे राक्षसकन्या एका झाडावर चढून बसली होती. तेथे जवळच एक विहीर होती. त्यावर पाणी भरायला पेटाची

मुलगी आली. हिचाही भाऊ राजपुत्राऐवजी राक्षसाला देण्यात आलेला व त्यामुळे मरण पावलेला होता. पण ते त्या मुलीला माहीत नव्हते. विहीरीत झाडाचे प्रतिबिंब पडले होते त्यात एक अति सुंदर मुलीचा चेहरा पाहून ती अगदी खूष झाली. तिला वाटले हे आपलेच प्रतिबिंब ! तिने हातातील कळशी दिली फेकून व घरी जाऊन आईला म्हणाली,

'काय ग ए ! मी काय म्हणून कामं करू असली ? मी किती सुंदर आहे, आज कळलं मला. राजवाड्यात मघाशी एक कुणी छान तरुण गेला त्याच्याशी माझं लग्न लावून दे !'

'पण तो आहे राजपुत्र निनाव्या. त्याच्यामुळेच माझा मुलगा मारला गेला बरं ! त्याच्याशी तुझं लग्न कुठलं होणार ? अग तू एका दरिद्री परटीणीची पोर, त्यातून दिसायला रद्दी–'

'हं ! खबरदार रद्दी म्हणशील तर- मी सुरेख आहे म्हटलंना ? आई तू काढ ना युक्ती काही त्या निनाव्याशी लग्न होईल माझं अशी ? '

परटिणीला थोडे मंत्रतंत्र येत होते. ती म्हणाली,

'त्याला कसली झोप लागली आहे, जागा होत नाहीए तो ! पण हा मंत्र पाठ कर. हा म्हटलास की तो जागा होईल व तुझी इच्छा असेल तेवढा वेळ जागा राहील ! जा. '

मोठ्या डौलाने ती राजवाड्यात गेली व राजकुमारावर मंत्र घालताच तो उठला. त्याला काहीच आठवत नव्हते.

ती म्हणाली, 'माझ्याशी लग्न करा.'

तो म्हणाला– 'बरे तर, तू मला या काळझोपेतून उठवलेस. मी जरूर लग्न करीन तुझ्याशी ' मग परत तो झोपी गेला !

तेवढ्यांत राक्षसकन्या जागी होऊन राजवाड्यात आली व

दारात उभी राहून म्हणाली,

'महाराज ! राणीसरकार, तुमचे पुत्र युवराज निनाव कुठे आहेत ? त्यांना मला भेटायचे आहे !'

राजा बाहेर आला, दुःखाने म्हणाला, 'तो इथे नाही पण मुली, तू कोण ? आमच्या पुत्राला राक्षसानं पळवून नेलं, पंधरा वर्ष झाली, तू त्याला कुठलं ओळखणार ?'

ती म्हणाली,

'हे काय बोलता राजे ? तुमच्या बाहेरच्या देवडीजवळच्या खोलीत तुमचा मुलगा येऊन झोपला आहे काल, तुम्हाला ठाऊकच नाही का ? मला हे गुपित कळलं जादूनं'

राजा व राणी आनंदाने वेडे झाले ! काय ? आमचा लाडका निनाव अजून जिवंत आहे ? अन् तो आमच्या दारात येऊन झोपला तरी आम्हाला पत्ताच नाही ? या राज्याचा मालक तो. त्याची ही दशा ?

' राजा म्हणाला–

'दमलेला कुणी एक प्रवासी येऊन देवडीवर मुर्छीत झाल्या-सारखा झोपल्याचे ऐकले होते खरे पण तो आमचा मुलगाच असेल ही कल्पनाही नव्हती. चल उठवू आपण या त्याला– पण तू कोण ?'

'मी आपली सून होणार आहे लौकरच लग्न ठरलंय आमचं.

तो म्हणाला– वा फारच छान सून मिळणार आम्हाला म्हणायची ? छान झकास.'

ते तिकडे गेले व राक्षसकन्येने त्याला हाक मारताच त्याची झोप गळाली ! तीही जादूगारीण होती, त्यापुढे माळयाच्या बायकोची न् परटाच्या बायकोची जादू एवढीशी, ती कसली

महत्त्वाची ?

परटाच्या मुलीनं तिला पाहिलं मात्र, याच सुंदर तरुणीचं प्रतिबिंब आपण पाहिलं, ते आपलं नव्हतं हे तिला उमजलं. थोडीफार बक्षिशी मागून ती तेथून घरी पळाली !

आणि मग राजपुत्राने त्या राक्षसकन्येनं त्याच्यासाठी किती श्रम घेतले, बोटेसुद्धा कापून मदत करायला मागेपुढे पाहिलं नाही व आपला जीव कितीदा वाचवला राक्षसाच्या तडाक्यातून ते सांगून वडिलांना म्हटले,

‘ ही माझी राणी होणार आहे. पसंत आहे ना तुम्हाला ? ’

ते म्हणाले,

‘ अगदी पसंत. हिला राक्षसकन्या म्हणणेही बरं वाटत नाही. खरे तर देवकन्येसारखी ही सद्‌गुणी अन् सुरेख आहे. ’–

ते लग्न लौकरच मोठ्या थाटामाटाने झाले. मात्र त्या माळणीला तिचा दुष्टपणा जाणून राजाने राज्याबाहेर हाकलून दिले, हद्दपार केले.

आता राजपुत्र व त्याची पत्नी सुखात नांदत आहेत !

★

## ३ : निळ्या तलावाची राणी !

अगदी अगदी गरीब होते– हुरान आणि बेला. लहानपणा-पासूनच ते एकामेकांचे खेळगडी होते व शेजारी शेजारी राहायचे. बेलाच्या आईने एखादवेळी छानशी केक केली तर ती हुरानला आठवणीनं त्यातला तुकडा पाठवी व हुरानच्या आईनं एखादी मिठाई केली तर बेला तिथे आली की, जेवायलाच ती तिला ठेऊन घ्यायची. पैसे नव्हते– पण प्रेमभाव अगदी छान होता त्या दोन घरांत.

हुरान मोठा झाला, बेलाही आईएवढी उंच झाली, तशी त्यांचा विवाह त्यांच्या आयांनी ठरवला. फार छान प्रेमळ जोडपं होतं– पण काय दैवगती पहा ? लग्न ठरले अन् कसलासा ताप येऊन दोघांच्याही आया त्यात मरण पावल्या ! जे काय घरात चार पैसे होते ते त्या दोघींच्या श्राद्धासाठी लागले. फिरून हुरानजवळ धड कपडा नाही की बेलाला पायांतल्या पायतणाला पैसे नाहीत, अशी दारिद्र्यावस्था ! मग दोघांनीही एकाच माणसाकडे नोकरी धरली.

नोकरी करणे काही सुखाचे असते काय ? हुरानला रोज शेतात भयंकर राबणूक होती व पगार इतकासा. तो म्हणे–

'बेला, एखादी गाय घेता येईल तर मी दुभत्याचा धंदा करीन यापेक्षा, चार पैसे जास्त मिळवीन व लग्न करू मग–'

'अन् मला सुद्धा इतका अपुरा पगार की, एक बरासा फ्रॉक-सुद्धा करता येत नाहीए. मला वाटतं आपल्या लग्नाला पैसे जमे-पर्यंत माझे केस पांढरे होणार !' ती म्हणाली.

'म्हणूनच मी ठरवलं आहे, मी नशीब काढायला दूरदेशी जातो व पैसे मिळवून येतो. तू मात्र थांबशील ना ? का श्रीमंताशी लग्न करशील एखाद्या ?'

'छे छे ! तू ये, मी तुझी वाट पाहत राहीन हुरान. शपथ तुझी. आणि थांब हं, माझ्या वडिलांनी मला तीन वस्तू दिल्या आहेत त्या या. बघ जरा, ही एक घंटा. माणूस संकटात असेल तरच ही घंटा वाजते, ही काठीही तशी परीनं दिलेली आहे, जादूचीच; ही माणसाला कुठेही घेऊन जाऊ शकते– अन् हा चाकू घे. तुला–'

'मजजवळ आहे ना एक चाकू ! आणखी कशाला ?'

'असू दे. हा वेगळ्या गुणाचा आहे. याचा स्पर्श झाला, की शापाने भलभलती रूपं मिळालेल्यांचा शाप मोडतो व त्यांना पूर्वरूप मिळतं ! तू दूर जाणार, जादूगार इकडे फार, तेव्हा याचा उपयोग होईल. ही घंटा न् ही काठी मी ठेवते मला. तू संकटात असलास की ही घंटा वाजू लागेल व मला ऐकू येईल; की लगेच मी काठीवर बसून तिकडे तुला सोडवायला धाव घेईन हं.'

मग त्या दोघांनी डोळे पुशीत निरोप घेतला एकमेकांचा.

खूप दिवस तो चालत होता. गावे, नद्या, टेकड्या, शहरे मागे पडत होती, पण त्याला भरपूर पगार देणारा कुणी धनवान माणूस भेटेना. अखेर एका खानावळीत त्याला लोकांची बोलणी ऐकू आली. व त्यातून 'निळ्या तलावाची श्रीमंत राणी' हे नाव वरचेवर कानी पडू लागले, तशी त्याने त्यांना 'ही कोण ?' म्हणून विचारले.

'काय ? तुम्हाला तिचं नावही माहीत नाही ? फारच दुरून आलात वाटतं ? इकडचं पाळण्यातलं पोरसुद्धा हसेल तुम्हाला. कारण त्यांनाही ठाऊक आहे राणी निळ्या तलावाची–'

'असेल, पण मला नाही ठाऊक ! सांगा, 'ही कोण आहे ?'

'ती एक परी आहे. तरुण, देखणी तर आहेच; पण मुख्य म्हणजे अलोट द्रव्याची, संपत्तीची मालकीण पण आहे ती. जंगलातल्या साऱ्या राजामहाराजांहून श्रीमंत ! तिच्याजवळचा हा प्रचंड खजिना मिळवायला खूप लोक तिकडे जातात– पण तुम्ही नका जाऊ हां, कारण ते जाणारे परत येत नाहीत ! गेले की गेलेच ! ! त्यांचं काय होतं, कोण जाणे.'

'ठीक ठीक ! मी जाऊन पाहून येणार– त्या लोकांचं काय झालं ते.' तो म्हणाला व त्याच्या मूर्खपणाला हसत का होईना पण लोकांनी त्याला निळ्या तलावाचा रस्ता दाखवला.

प्रथम रानावनातून रस्ता व अखेर शेवटी समुद्रातून वाट होती ती. त्याला जलमार्गाने बरेच दूर जावे लागले. मग समोर एक हिरवेगार व प्रचंड बेट दिसले. तोच निळ्या तलावाचा प्रांत.

तो तेथे उतरला. झाडाझुडांनी झाकलेले ते मोठे बेट व त्यापलीकडे एक निळे शार पाणी असलेला मोठा तलाव. फार सुंदर देखावा होता. जरा तलावात फिरून यावे का ? पण कसे ? तेथे

एखादे होडगे पण नव्हते. तोवर एक हंस काठाशी झोपलेला त्याला दिसला– खरे तर, तो हंस नसून, ती एक माणूस बसेल एवढी फळीची होडी होती– हंसाच्या आकाराची, त्याने आत पाऊल ठेवताच होडी आपोआप तलावातून फिरून येऊन एका अतिसुंदर राजवाड्यासारख्या घरासमोर थांबली. अहा ! काय सुंदर घर ? हुरान बघतच राहिला. शिपल्याच्या आतल्या बाजूला जसे अनेक रंग झळकतात तसे सप्तरंगी घर व खरेच, त्याला शिंपले, मोती, प्रवाळ इत्यादींच्या भिंती होत्या ! समोरच जिना होता. त्याने तो चढायला सुरुवात करताच दरेक पायरीतून सुरेल आवाजही उठू लागले. बोलून चालून परीचे घर ! तेथे सुंदरपणा होता, तशी अद्‌भुत जादू पण दिसणारच !

तो वर गेला व समोरच त्याने राणीला पाहिले. कित्ती सुंदर होती ती ? स्वर्गातली अप्सराच जणू एखादी.

राणी उठून बसली व म्हणाली–

‘तू कोण ? हा रस्ता तुला कसा सापडला आणि तू कशासाठी आला आहेस ?’

‘मी एक गरीब मनुष्य आपली किर्ती ऐकून आलो. पोटा-पाण्याचा उद्योग करावा, चार पैसे मिळवावे म्हणून आलो. खूप लोकांनी वाट सांगितली.’

‘पोटापाण्याचा उद्योग ? चल तर न्याहारी तयार आहे, ती आधी घे पोटभर. छान दिसतोस, मी देईन तुला नोकरी. चल.’

न्याहारी झकासच होती. उंची सरबते व तऱ्हतऱ्हेच्या मिठाया आणि केक्स. तो अगदी तृप्त झाला. राणी कुणी देवता तर नाही ना ?

राणीने त्याला विचारले,

'तुला पैसे मिळवायचे, ते कशाला ?'

'मला लग्न करायचं आहे. एक नाणेही जवळ नाही-' तो खेडवळ तरुण साधेपणे म्हणाला. राणी हसली अन् म्हणाली-

'हात्तेच्या ! लग्न तर इथेही होऊ शकेल तुझं. तिकडे परत कशाला जायला हवं ?'

'म्हणजे ? मी नाही समजलो राणी-'

'ठीक. स्पष्टच सांगते. माझा नवरा मरून गेला आहे व मला परत लग्न करायचं आहे. तू एकदम पसंत आहेस मला ! तर माझ्याशी तू लग्न कर- की अर्ध्या संपत्तीचा तू मालक होशील.'

क्षणभर त्याला समजेचना- आपण हे खरं ऐकतो की स्वप्नात ? मी अर्ध्या जगाच्या इस्टेटीचा मालक ? केवळ या सुंदरीशी लग्न केल्याने एवढे पैसे मिळणार, काय हरकत ? अन् मी तरी एवढा हिला पसंत कसा पडलो पाहताच ? हेच नवल म्हणायचं. एकदम त्याला आठवले, गावातले लोक म्हणायचे, 'अगदी राजबिंडे रूप आहे हुरान तुझे. कुणीही राजकन्या खुषीनं माळ घालील.' अन् बेला म्हणे-' तुमची दृष्ट काढायला हवी असे छान दिसता.'

अरे ! बेला ! त्याला एकदम सारे आठवले, बेलाशी लग्न करायचे आहे ना आपल्याला ? मग इथे लग्न. या दुसऱ्या बाईशी ? छे छे ! भलतंच ! पैशाच्या मागे लागून वाहात जाणार होतो मी, चुकलंच माझं. माणसानं आपलं ध्येय विसरून नाही चालत !

तो म्हणाला- 'मी एक गरीब मजूर आहे राणी. मला असं श्रीमंतीनं राहायला शिकायलाही वेळ द्या. आधी नोकरी द्या. विचार करायलाही दोन-चार महिने हवेत ! लगेच नको बाबा लग्न-'

'ठीक. दोन महिन्यांनी सांग, तोवर माझा मित्र म्हणून रहा व पुढे सगळे तुझेच होणारे राज्य पाहून घे, माझ्याबरोबर हिंडून ! चल आता माझं मत्स्यालय बघायला. मजा वाटेल तुला. मी माशानं किती कसरती शिकवल्या आहेत त्या बघ !'

तिने माशांना तऱ्हेतऱ्हेची नावे दिली होती असे दिसले. एका लहानशा कुंडांत तऱ्हेतऱ्हेचे मासे होते. हातात एक लोखंडी तारांचे छोटे जाळे घेऊन ती तिकडे गेली. हुरान पाठीशी होताच!

तिने हाका मारायला सुरुवात केली–

'या सावकार !'

'राजे सरकार, मारा उंच उडी जाळ्यात पाहू ?'

'अरे मल्ल, तिकडे नाही, इकडे, जाळ्यात ये जाळ्यात !'

'पुजारीबुवा, चला पोटपूजेला आमच्या.'

'शिपीदादा लवकर उडी घ्या बघू ?'

टपाटप् एकेक मासा जाळ्यात उंच उडी मारून आला. घरी जाऊन तिने काही मासे पाण्यात सोडले व काही तळायला पाठवले, तेथून काहीतरी कुजबूज ऐकू येऊ लागली– कुणी हळू बोलावे तशी.

'कसला आवाज ?' त्याने प्रश्न विचारला.

'काही नाही, लाकडं पेटताहेत, त्यांचा येतो असा आवाज. बरं, हे बघ मी स्नान करून येते. तू बैस येथेच आरामात बरं का.'

ती गेली तशी पाण्यात मासे सोडले होते त्यांतून परत मधमाशी गुणगुणावी तसे शब्द उमटू लागले. शब्द नव्हतेच ते, नुसती गुणगुण. मासे व गुणगुणण्याचा आवाज ? बापरे !

माशांना तर आवाजच देवाने दिलेला नाही, मग ही गुणगुण कशी करतात हे मासे ? शापित तर नाहीत ?

एकदम त्याला बेलाने दिलेल्या चाकूची आठवण आली. 'शापिताला याचा स्पर्श झाला की बस्. त्याला पूर्व रूप प्राप्त होतं म्हणाली होती बेला, नाही का ? त्याने त्या चाकूने हलकेच त्या माशांना स्पर्श केला व काय नवल ? दोन देखणे तरुण त्याच्या समोर उभे !

एक म्हणाला–

'हुरान ! आम्हाला वाचव रे या राक्षसीच्या हातून ! दया कर ! '

दुसरा– म्हणाला 'हुरान, तू कसा हिच्या तावडीत सापडलास जीव घेऊन पळ ! '

'कोण राक्षसी ? ही परी– सुंदरी ? ' हुरानने विचारले.

'अरे, कसली परी ? तिनं सोंग घेतलय् सुरेख परीचं. पण ती महादुष्ट आहे. रोज मजेनं आमची शिकार करते– '

'पण तुम्ही कसे इथे ? '

'तुझ्यासारखेच ! श्रीमंत बेटात श्रीमंती मिळेल म्हणून आलो आम्ही, पैशांचा मोह भारी वाईट ! आम्ही तर तिच्या गोड बोलण्याला फसून लग्न केले तिच्याशी ! अन् मग आठ दिवसांत आम्हाला तिने मासे करून फेकलं कुंडात ! तुझीही हीच गती होईल बाबा.'

ते निघून जाऊ लागले. पण परीने दाराआड उभे राहून सगळे ऐकले होते. तिने त्या दोघांवर लोखंडी जाळे फेकले व म्हटले 'कुठे पळता ! व्हा सरडे, अन जा धावत बागेत !' मग दोन सरडे सुरूसुरू पळत कुठे नाहीसे झाले !

हे पाहून हुरानही पळून जाऊ लागला, तोवर त्याने शब्द ऐकले–

‘अन् तू हो बेडूक ! भिकारडा क्षुद्र मनुष्य ! जा बागेत खेळ !’

मग एक बेडूकही उड्या मारीत बागेत धावत सुटला व राणी खदखदून हसू लागली. तिची करमणूक यातच होती रोजची ! दुष्टांना दुसऱ्यांचा छळ करण्यात व हाल पाहण्यातच गंमत वाटते, ती अशी.

*

इकडे बेलाच्या पिशवीत घंटा होती, ती हळूहळू याच वेळी वाजू लागली– ‘किण किण्णण्ण् ! किण किणकिण !’

बेला घाबरली. मालकाच्या गाईंचे दूध काढीत होती ती त्यावेळी. सारखी घंटा वाजतच होती... ‘किणकिण्...किण्ण्–’

ती मनात म्हणाली, ‘हुरान नक्की संकटात सापडला आहे, उमेदीचा माणूस आहे. प्रामाणिक, कष्टाळू पण आहे, पण बिचारा साधाभोळा आहे अगदी ! काही असो, मला गेलंच पाहिजे त्याला सोडवायला !

तिने त्याच दिवशी मालकाकडून रजा घेतली, काही दिवस गावाला जाऊन येते म्हणून सांगितलं, गेल्या चार महिन्यांचा पगार मागून घेऊन घरी आली व जादूच्या काठीस नमस्कार करून म्हणाली,

‘काठी काठी ! तू माझ्या वडिलांना एका सज्जन परीकडून मिळालीस ना ? मी प्रार्थना करते, माझा हुरान असेल तिथे मला घेऊन चल.’

तिने शब्द ऐकले– ‘चल तर बेटा, जाऊ या लगेच.’

कोण बोलले ? डोळे उघडते तर एक मोठा गरुडपक्षी काठीच्या जागी उभा ! काठी कुठेच नाही ! गरुड म्हणाला–

‘बेला, परीच्या काठीनेच हे पक्षीरूप घेतले. आकाशातून जावं लागणार आहे आपल्याला, म्हणून ! चल झटपट !’

ती पक्ष्यावर बसली व सूंऽऽ करून तो आकाशातून झेपावू लागला. जसे वेगवान विमानच ! हे पक्षीविमान तिने एका खूप



गरूडावरून उतरल्यावर बेलाला एक ठेंगु माणूस दिसला.

दूरदूरच्या डोंगराच्या कड्यावर थांबवले, कारण कड्यावर तिला एक अगदी काळा कुळकुळीत ठेंगू माणूस दिसला. त्याला माहिती विचारावी म्हणूनच ती तेथे उतरली. जवळच तो माणूस बसला होता. मातीचे सहा घोडे किंवा खेळणी घेऊन. तो म्हणाला,

'ओहो ! किती दिवसांनी माणूस पाहतो आहे मी ! नाहीतर या उंच कड्यावर कोण येतो ! मुली, तू दयाळू दिसतेस ! मला येथून सोडव बघ, माझे पाय पांगळे करून बसवलं आहे मला तिनं इथं ! सोडव मला पोरी !'

'अरे बाबा, मी कुणी देवता– परी नाही रे, तुला शापातून सोडवायला– मी साधी मानव, मुलगी. मी कसं सोडवू तुला ? सांग !'

'तुझ्या हुरानची सुटका कर– त्या दुष्ट राणीच्या तडाक्यात सापडलेल्या-बस् ! तो बेडूक झाला आहे बापडा–'

'काय ? हुरान दुष्ट राणीच्या तडाक्यात ? कुठली राणी ही ? अरे ठेंगूदादा मला सगळं सांग ! अरे मी त्यांना आणायलाच निघाले आहे, माझं लग्न ठरलंय त्यांच्याशी ठेंगूदादा – सांग, कसं मी तुला अन् त्यांना सोडवू ?'

ठेंगूने एका झाडाकडे बोट दाखवीत म्हटले, 'सांगतो, नीट ऐक, झाडावर ते बघ, मी राजा असतानाचे माझे उंची कपडे; तुला छान होतील ते. घाल बघू ? तुला तरुण पुरुषाचं रूप घेऊनच त्या बयेकडे जायला हवं--'

'कोण बया ?'

'ती राणी-- निळ्या तलावाची राणी हे नाव तिचं, पण ती एक जादूगारीण आहे. फार चलाख आहे. तिची गाठ घे व युक्तीनं तिचं मंतरलेलं जाळं तिच्या बटव्यात असतं ते काढून घे.

मग तिची शक्ती खलास ! जा, धीरानं वाग मुली-- आम्ही खूप-जण तुला आशीर्वाद देतो-- विजयी हो.'

मग तिने तो पोशाख केला. काय सुंदर दिसत होती ती आता ! ठेंगू म्हणाला-- 'वा ! राजा असावा तर असा !'

ती पक्ष्याला म्हणाली--'पक्ष्या, चल आता निळ्या तलावाच्या बेटात थेट !' व पक्षी अर्ध्या घटकेत तेथे आला. मग त्याला परत काठी बनवून तिनें हातांत घेतले व राणीची गाठ घेतली.

जन्मात राणीने इतका रूपसुंदर माणूस पाहिला नव्हता ! होय, बेला गरीब असली तरी रूपाच्या बाबतीत राणीहून झकास आणि सुरेख होतीच मुळी ! राणीला वाटले--

'नवरा असावा तर असा ! आतापर्यंत आले ते कसले मेले भुक्कड लोक ! तो हुरान चांगला होता, पण त्याने माझी जादू ओळखली म्हणून घालवून दिलं. याच्याशी लग्न करीन मी आता.'

'आपण इकडे कोणीकडे ? कोण आहा ?' राणीने विचारले.

'मी जांभळ्या बागेचा राजा ! तुमची बाग फार सुंदर आहे असं ऐकतो. मुद्दाम बघायला आलो आहे. आम्ही तशीच करू बाग.' राणी गोड शब्दांत म्हणाली,

'वा वा ! आनंदाची गोष्ट. चला जेवण करा आधी. मग माझी गरीबाची टीचभर व क्षुद्र बाग बघायला जाऊ राजे-सरकार !'

खरेच ! काय ती बाग सुंदर होती ? तऱ्हेतऱ्हेची कारंजी उडत होती तेथे. ताटलीएवढाले गुलाब जागोजाग उमलले होते. तेथले अंजीर ओंजळीत मावू नयेत इतके मोठे व गोड तरी किती ? अहाहा, अशी बाग बेलाने जन्मात कुठे बघितली नव्हती.

बेला ऊर्फ आपला राजपुत्र एकदम म्हणाला--

'वा ! किती मनोहर आहे बाग ! वाटतं इथून हलूच नये ! येथेच जन्मभर राहावं !'

राणी आनंदाने म्हणाली--

'ते तर फारच चांगलं होईल. मी प्रार्थना करते राजा. ही बागच नव्हे तर माझं सारं वैभव, द्रव्य, संपत्ती, राजवाडे आपल्या मालकीची करून देईन मी. फक्त एका अटीवर--'

'अँ ! काय म्हणालात ? ही दिव्य बाग माझी होईल ?'

'होईल होईल ! फक्त एक छोटीं क्षुद्र अट--'

'अट बोला !'

'काही फारशी कठीण अट नाही. आपण माझ्याशी लग्न करावे !'

'वा वा ! छान ! मला तरी हेच मनात येतेय– पण आजच नको लग्न बुग्न. पहा ना, मी प्रवासाने दमलोय. जरा बागेत बसतो. वा ! हे कुंड, माशांचे काय ? सुंदर. किती रंगांचे मासे ? आपण अस्सं तयार करणार एक कुंड. राणीसरकार, मासे कसे पकडता ? दाखवा ना मला ?'

राणीने बटव्यातले जादूचे जाळे काढून पाण्यात बुचकळून म्हटले– 'लोहार, सुतार या वर !'

झटपट दोन मासे उडी मारून आले जाळ्यात ! राजाला ही गंमत बघून हसू आवरेना.

'तो म्हणाला– 'मी बघू का एकदा हा प्रयोग करून ? मला जमेल ?'

'तसे अगदी सोपेच तर आहे. 'या' म्हटले, की येतात मासे

वर. हे घ्या जाळं. पण आता एकदाच हं. मी थकलेय. घरात जाऊ या !'

'राजाने' चपळाईने ते जाळे तिच्याच डोक्यावर घालूनम्हटले,

'तुझं मूळ रूप धारण कर ! दुष्टे, तू परी नाहीस, ठाऊक आहे मला !'

राणीने खूप धडपड केली--पण 'राजाने' जाळे खूपच आवळले व त्या जाळ्यात परी-- परी कुठली ? एक कुरूप घाणेरडी जादूगारीण दिसू लागली ! बागेतच एक कोरडा खूप खोल खड्डा होता तेथे जाळं फरफटत नेऊन बेलाने खोल टाकले व तोंडावर खूप माती, दगड लोटले ! खड्डा बुजला ! परी दिसेनाशी झाली!

राजाच्या पायांत एक बेडूक ड्रॉवड्रॉव ओरडत होता. त्याच्या तोंडात एक छोटा चाकू धरला होता त्याने. बेलाने आपला चाकू ओळखला व तो काढून घेऊन पाते उघडून तिने स्पर्श करीत म्हटले, 'तू कोण ? मूळ रूपात प्रकट हो !'

दुसऱ्या क्षणी हुरान तिच्यापुढे उभा राहिला. केवढी आनंदाची व भाग्याची गोष्ट !

मग त्या दोघांनी पक्ष्यावरून जाऊन त्या ठेंगू काळ्याची सुटका केली शापातून त्याला मंतरलेल्या चाकूचा स्पर्श होताच एक देखणा राजा त्यांच्यासमोर उभा राहिला व ते मातीच्या खेळण्यातले घोडे ? ते खरे मोठाले पांढरे स्वच्छ उंच सुंदर घोडे झाले. कोपऱ्यात केर, अडगळ पानांची होती. तेथे एक रथ उभा ! त्याला घोडे जुंपीत राजा म्हणाला--

'मुलांनो, निळ्या तलावाचा खरा राजा मी. माझी बायको ती परी-- नव्हे जादूगारीण ! मला ती जादूगारीण आहे हेही आधी

ठाऊक नव्हतं. फार रूपवान, म्हणून लग्न केलं तिच्याशी, पण ती दुष्ट छळू लागली माझ्या गरीब प्रजेला. वाटेल तशी रूपे देऊन गंमत पाहू लागली ! मी रागावलो तिला तशी मलाही हे ठेंगू निग्रोचं रूप दिलं होतं ! चला; तुम्ही येऊन सुटका केली माझी. आता इतरांचीही करू या. बागेतल्या कुंडातले मासे सगळे माझे प्रधान, सेनापती, नोकर-चाकर व प्रजेपैकीच आहेत-- धन्यवाद !'

मग तो रथ दुसऱ्या रस्त्याने धडधडत परत निळ्या तलावाच्या बेटात आला. राजाने त्या खड्ड्यावर खूप मोठे दगड ठेचून भरले व परीराणी मरून गेली. दुष्टाला असेच शासन देव देतो !

*

बेला अन् हुरानला आता द्रव्याचा काय तोटा ? निळ्या तलावाच्या राजाने त्यांना खूप द्रव्य देऊन त्यांचे थाटात लग्न लावून दिले. आता बेला व हुरान आपल्या गावी आनंदात राहताहेत !

★

## ४ : तीन रंगाची पत्नी

राजपुत्र शिकारीस आला होता दूरदूर. त्या बर्फमय प्रदेशात शिकार म्हणजे उडत्या पाखरांचीच ! याने एक बाण मारला तर एक कावळा बाण लागून पडला, त्याचे लालभडक रक्त त्या शुभ्र बर्फावर ओघळले.

राजपुत्राने ते पाहिले. सफेद शुभ्र बर्फ काळा कुळकुळीत कावळा व लाललाल रक्त. तिन्ही रंग त्या जागी त्याच्या एकदम डोळ्यांत भरले. एकाच जागी तीन रंग ? बस् ! हे तीन रंग एकत्र दिसतील अशीच पत्नी मला करायची. तिचा रंग गोरा– बर्फासारखा हवा, केस काळेभोर व लालबुंद ओठ असायला हवे . ठरलं ! अश्शीच पत्नी हवी. नाही मिळाली तर लग्नच नको. ठरले !

गोऱ्या लोकांच्या देशात काळ्या केसांची माणसे कमीच. त्याला खूप हुडकूनही तशी मुलगी मिळेना. व लाल ओठ, गोरा रंग होता पुष्कळजणींचा. पण केस ? ते तांबूस, सोनेरी, पिंगट, पिवळे असे ! छे ! असली नको बुवा. काही वर्षे उलटली ..पण अशी तरुणी दिसेना व राजपुत्राचं लग्न होईना ! अखेर त्याने शंभर

मोहरा बरोबर घेतल्या व बायको शोधायला तो देशांतरी निघाला.

वाटेत एके ठिकाणी त्याने एक स्मशानयात्रा पाहिली, तिला वाटेतच शिपायांनी अडवले होते व त्या मृत माणसाची पत्नी व लहान मुले उभी होती, ती रडत होती. त्याने त्या बाईला विचारले, ‘ हा काय प्रकार ? प्रेतयात्रा अशी मध्येच का अडवली आहे ?’

त्या बाईने उत्तर दिले-- ‘ बाबा, आम्ही अगदी गरीब लोक. माझ्या या नवऱ्याने शंभर मोहराचे कर्ज त्या सावकाराकडून घेतले होते उद्योगधंद्यासाठी. पण तो एकाएकी मेला ! म्हणून या सावकाराने शिपाई आणून प्रेतयात्रा अडवली आहे. मला म्हणतो, ‘ कर्ज टाक ! तर पुढे जाऊ देईन यात्रा.’ आता मजजवळ एकही मोहर नाही ! आणू कुठून मी ? सांग.’

राजपुत्राला दया आली. त्याने जवळच्या साऱ्या मोहरा त्या सावकाराला दिल्या ! कर्ज फिटल्याची पावती त्या गरीब बाईला सावकाराने दिली व ते शिरपुडे गेले एकदाचे ! यात्रा पुढे चालू झाली. त्या मृताची कर्जातून सुटका झाली होती !

*

त्याच सायंकाळी एक लहानसा ठेंगू माणूस त्याच्याकडे नोकरीला राहिला. राजपुत्राला वाटले, बरे झाले, या बिन-माहितीच्या देशात भटकायचे, एक इथलाच माहीतगार मिळाला, तो वाटाड्या होईल माझा. ठेंगूने विचारले-- ‘ मालक, आपण कुठे अन् कशासाठी जाता आहात ?’

त्याने ‘ तीन रंगांची पत्नी ’ हुडकायला जातो ’ असं सांगून शिकारीची गोष्ट सांगितली.

ठेंगू हसला अन् म्हणाला,

'फार कठीण ! मी खूप देश पाहिलेत, पण काळे केसवाली व तुम्ही म्हणता त्या तिन्ही रंगांची मुलगी इकडे कुठेही नाही. फक्त एक पूर्वदेशच्या राजाच्या मुलीशिवाय ! तिचे केस काळेभोर व रंग शुभ्र आहे–'

'काय ? अशी राजकन्या आहे म्हणतोस ? नक्की ? चल तर तिकडेच जाऊ. तुला वाट ठाऊक आहे ना ? मला तीच पत्नी हवी. ठरलं– चल !'

ठेंगू म्हणाला–

'मालक, जरा विचार करून बेत ठरवा. ती मुलगी इतकी सुंदर आहे की, खूप तरुण तिला मागणी घालायला गेले, पण एकही परत आला नाही !'

'तरी मी जाणार ! जगलो तर लग्न– मेलो तर मेलो त्या प्रयत्नात !'

'चला तर. मला तो मुलूख छान ठाऊक आहे.'

ते चालत राहिले. काही अंतरावर एक काळाकुट्ट किल्ला दिसला.

राजपुत्र म्हणाला–'ठेंगूमामा, त्या किल्ल्यात जाऊ या ? थकलो मी. दोन घास खाऊ, झोप घेऊ रात्रभर, त्या मालकाला आपल्या जेवणाचे पैसे देऊ चला–'

'मालक, तो राक्षसाचा अंधारकिल्ला आहे. तिकडे जाणं नको–'

'का ? आपल्याला रात्रीचा निवारा नको आहे का ?'

'हवाय, पण ऐका आधी. ह्या राक्षसाजवळ एक अदृश्य करणारा झगा आहे. म्हणून त्याचं नावही अंधारझगाच आहे.

तो माणसं खातो ! चला इथून –'

'नाही. आपण लढू त्याच्याशी. मीं चांगला शूर आहे. ठोठाव दार त्याचं.'

ठेंगूने दार ठोठावताच एका उग्र राक्षसाने ते उघडले.

तो ओरडला–जसा ढगच गडगडला एखादा.

'कोण तुम्ही ? काय हवंय तुम्हाला ?'

'काही नाही– फक्त नीट जेवण अन् छान झोप !'

'अरेच्या ! मलाही फक्त हेच हवं होतं– तर तुम्ही दोघे आयते पुढे येऊन उभे ! चला, तुम्हाला खाऊन मीही थंड छान झोपेन.'

अंधारझगा राक्षस अंगावर चालूनच आला– पण राजपुत्र त्याच्याशी शौर्याने लढला व त्याने त्या राक्षसास ठार केले.

'मालक, त्याचा अंधारझगा घेऊन जाऊ या. उपयोगी पडेल पुढे !' ठेंगू म्हणाला व त्याने आतून झगा आणला. तो घेऊन ते निघाले.

●

परत दूर चकचक करणारा एक किल्ला दिसला.

राजपुत्र म्हणाला– 'इतका चकाकतोय कसा तो किल्ला ?'

'चकाकणारच ! तो किल्ला चांदीच्या पत्र्याचा आहे ना ?'

'काय ? सारा किल्ला चांदीचा ? कमाल आहे ? कुणाचा आहे तो ?'

'पैशाच्या थैलीच्या राक्षसाचा. त्या थैलीतील पैसे कितीही काढा, ते संपत नाहीत, मग त्याला काय कमी ? वैभव खूप आहे इथे.'

'ती थैली पाहिजे बुवा आपल्याला. प्रयत्न करू या ?'



राजपुत्र अंधारझगा– राक्षसावर चालून गेला.

‘करा वाटलं तर, पण तो राक्षस दोन डोक्यांचा व दुष्ट आहे–’

‘असू दे. आमची तलवारही दुहेरी धारेची आहे चांगली –’ त्यांनी दार ठोठावले. दोन डोक्यांचा राक्षस अंगावर धावून

आला व म्हणाला, ‘ तुम्हाला भाजून खाऊ की कच्चेच खाऊ रे ?’

राजपुत्राने बघता बघता झगा अंगावर घातला व तो अदृश्य झाला. तो राक्षसाला म्हणाला–

‘ तुला मी तलवारीनं ठार करू की खंजीराने ते बघ आधी. ’

पण राक्षस कुणाशी लढणार ? बोलणे ऐकू येत होते– पण बोलणारा माणूस ? तो अदृश्य ! कुठे घाव घालणार राक्षस ? या लढाईत राक्षस अखेर मेला व पैशाची थैली घेऊन ते निघाले पुढे–

तिसरा ‘ तलवार किल्ला ’ तलवार राक्षसाचा. त्या किल्ल्याचा एक बुरूज थेट तलवारीच्या आकाराचा व उंच होता. राजपुत्र म्हणाला–

‘ आँ ? इथे तलवारीचं बरंच महत्त्व दिसतं, किल्याचं नाव तेच राक्षसाचं नाव ? तलवारच ?’

‘ मालक, या राक्षसाजवळ एक सदाविजयी तलवार आहेच मुळी तशी, म्हणून हे नाव. हा बुरूज मुद्दाम याने असा बांधलाय. हाही राक्षस भयंकर उग्र आहे, तीन डोक्याचा आहे हा–’

‘ असू द्या. लढायचं म्हटल्यावर दोन डोकी काय, तीन काय ?’

‘ चला तर मग. फार शूर आहात खरे आपण. ’

‘ कसचं कसचं ? देवाची कृपा सारी. बरं, ठोठाव दार. राक्षसाला भेटायला ही माझी तलवार अगदी उतावीळ झाली आहे ठेंगूमामा !’

तो राक्षस प्रचंड, डोंगर असावा तसला मोठा. पण राजपुत्राने अंधारझगा अंगावर घालून लढाई केली. त्यात राक्षस मेला व सदाविजयी तलवार घेऊन ते पुढे निघाले. आता राजपुत्राजवळ

तीन अद्‌भुत वस्तु जमल्या. अंधारझगा, अखंड द्रव्याचा बटवा व विजयी तलवार.

*

किती तरी दिवस बापडे चालताहेत ! दऱ्या , डोंगर, त्यांनी ओलांडले, कांही गावे, असलेच काही किल्ले, हेही लागत होते मध्येमध्ये. ठेंगू म्हणाला–

' मालक, आता पूर्वानगरीच्या वेशीतच उतरायचं. मध्ये वेळ घालवायचा नाही. '

ठेंगू उत्तम वाटाड्या, चांगला मदतनीस व चतुर सेवक होता. तो राजपुत्राला आवडूही लागला होता, सेवक नव्हे तर मित्रच वाटत होता तो त्याला. कित्येक दिवसानी पूर्वानगरीची वेस त्यांना दिसली, तसा राजपुत्र म्हणाला– ' सुटलो एकदाचे प्रवासातून ठेंगूमामा आपण. मनासारखी बायको मिळायला इतके श्रम पडतात ? ठाऊक नव्हतं मला. '

' ठेंगू हसला, तांबूस दात दिसले त्याचे. तो हसून म्हणाला–

' संकटातून सुटलो कसचे मालक ? येथे प्राणसंकटात सापडणार आहोत आपण उलट. हुश्शार मालक ! '

रात्री ते वेशीबाहेर धर्मशाळेत उतरले. पहाटे ठेंगू म्हणाला,

'मालक, मी गावात जाऊन घोड्यांचे आणि आपले अलंकार घेऊन येतो. जरा द्या इकडे– ती अखंड थैली– सोन्याचे दागिने आणू–'

' आँ ? योद्धयाला सोन्याचे अलंकार ? ठेंगूमामा, मला नकोत दागिने बुवा. अहो, तलवार, भाला, खंजीर हेच दागिने वीरांना आवडतात. तुम्हाला आणा– हवंतर–'

' ऐकून तर घ्या. येथे पैशांनाच जास्त किंमत आहे, प्रवेश

मिळण्यासाठी हे श्रीमंतीचे सोंग करायचे; तर राजवाड्यात जाता येईल.'

'ठीक. मग आणा. ही थैली, खायप्यायचेही आणा छानसे. दमलोय मी अगदी बरं का.'

ठेंगू झटकन घोडे घेऊन गेला व घोड्यांच्या गळ्यांत सोनेरी माळा, मस्तकावर रत्नतुरे, पायात सोन्याचे तोडे व भरजरी झुली त्यांच्या पाठीवर असे घोड्यांना सजवून घेऊन आला. राजपुत्राला भरजरी पोशाख व हिऱ्यामोत्यांचे झगमगणारे दागिने व स्वत:लाही रेशमी कपडे आणले त्याने. पैशाला काय कमी? अखंड द्रव्यबटवा होताच की!

मग ठेंगू म्हणाला–

'आता वेशीतून राजवाड्यात चला श्रीमान. हा घ्या बटवा हाती. मूठमूठ मोहरा उधळीत चला शिपुरड्यांवर जागोजाग, ते उत्तम.'

पाहता पाहता राजकन्येच्या दूतांनी वार्ता दिली की 'प्रत्यक्ष देवदूतासारखे दिसणारे कोणी एक श्रीमान येताहेत! काय रूप त्यांचे? अहाहा! अन केवढे वैभव? मोहरांची रस्त्यात उधळण करीत येताहेत! वा, वा!'

राजकन्येलाही वाटले, असे कोण आले? ती म्हणाली,

'जा, त्यांना उतरायला इकडेच आणा! योग्यतेची माणसे दिसताहेत.' राजपुत्र व ठेंगू मग राजवाड्यात आले, पाहुणे म्हणून. त्याने राजकन्येला पाहिले– पाहिले मात्र, त्याचे डोळे तिच्याकडून वळेनातच! ओहो, हीच ती, तीच ही! रंग बर्फासारखा शुभ्र, केस कावळ्या[illegible] पाठीवरून खाली उतरलेले व ओठ रक्त[illegible] ला हीच

IRBY-0117714